महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२२/तेवीस                दिनांक : १० एप्रिल, २०२४.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम पुढे ढकलणेबाबत.

संदर्भ :- (१) जाहिरात क्रमांक ०३६/२०२३.
(२) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक १३ मार्च, २०२४.
(३) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक २१ मार्च, २०२४.
(४) आयोगाचे समक्रमांकाचे प्रसिद्धीपत्रक दिनांक ०१ एप्रिल, २०२४.
(५) पोलीस महासंचालक यांचे पत्र क्रमांक, पोमसं/०५/१०/ससे-पोउपनि(मुख्य) परीक्षा-२०२२/३९/२०२४, दिनांक १० एप्रिल, २०२४.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ वरील प्रसिद्धीपत्रकान्वये महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम दिनांक १५ एप्रिल ते २ मे, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. तथापि, संदर्भ क्रमांक ५ वरील पत्रान्वये राज्यात होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त व कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याकरिता मनुष्यबळ आवश्यक असल्याने शारीरिक चाचणीच्या कार्यक्रमाकरिता पोलीस अधिकारी तसेच इतर मनुष्यबळ पुरविणे शक्य होणार नसल्याचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक यांनी कळविले आहे. हे विचारात घेता शारीरिक चाचणीचा दिनांक १५ एप्रिल ते २ मे, २०२४ या कालावधीतील नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत असून, शारीरिक चाचणीचा सुधारित सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई.